# प्रकरण चौथे

# 'सांजरंग' आशयविचार

# प्रकरण चौथे

# 'सांजरंग' आशयविचार

**प्रास्ताविक :-**

नामदेव चं. कांबळे यांच्या 'उनसावली' या कादंबरीनंतरचा कथाभाग 'सांजरंग' या कादंबरीत आलेला आहे. उनसावलीमध्ये रघूच्या महाविद्यालयीन जीवनाचे, वसारी गावात घडणाऱ्या विविध घटनांचे चित्रण आले आहे. तर १९९९ साली प्रकाशित झालेल्या २८० पृष्ठांच्या 'सांजरंग' मध्ये पुढचा कथाभाग सुरु होतो. रघुला नोकरी लागल्यानंतर त्याचे पुढील शिक्षण व वैवाहिक भावजीवन येते. त्याचबरोबर वालंबीच्या मृत्यूपर्यंतचे वसारीतील सामाजिक जीवन 'सांजरंग' या शेवटच्या भागामध्ये चित्रित झाले आहे.

**'सांजरंग'चे कथानक :-**

पुसदच्या फुलसिंग नाईक महाविद्यालयात शिकलेला रघू तेथेच कारकून म्हणून नोकरीस लागतो या घटनेने 'सांजरंग' कादंबरीच्या कथानकास सुरुवात होते. नोकरीचा पहिला दिवस पूर्ण करुन जवाहर नगरकडे जाताना रघूला आपला भूतकाळ आठवतो. आपले आईवडील अठरा विश्व दारिद्र्यात जन्मले, जगले. वडील वारल्यानंतर एकट्या आईने आपल्याला शिकवले. आईने आपल्याला शाळेची वाट दाखविली आणि त्यामुळेच आजचा गोड दिवस पाहायला मिळाला. असेच काहीसे भूतकाळाचे चक्र रघूच्या मनात फिरत राहते.

सितारामबरोबरच आपल्या आईलाही वसारीहून पुसदला नोकरीच्या गावी घेऊन यावे असा विचार त्याच्या मनात येतो आणि पुसदला प्रकाशनगरमध्ये दोन खोल्यांचे घर तो भाड्याने घेतो. आपला चिमुकला संसार तेथे थाटतो. वामनराव देवकाते व कमलाबाई आपल्या भावी जावयाच्या संसारासाठी त्याला मदत करतात. संसाराची मांडणी करुन देतात.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर सीतारामही आपल्या भावाकडे पुसदला येतो. त्याच्या येण्याने वालंबी वसारीला एकटीच राहते. नोकरीत स्थिर झाल्यानंतर रघू आपल्या आईला नोकरीच्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी गावी येतो. वालंबीचे मात्र उन पावसात कष्ट करणे चालूच असते. रघुने आग्रह करुन ही

वालंबीला आपले हक्काचे घर, वतनाचे गाव सोडू वाटत नाही. रघू वसारीहून आईचा निरोप घेऊन नोकरीच्या गावी येतो.

नंदाचा एस.एस.सी.चा निकाल लागलो. पन्नास टक्के गुण मिळवून ती पास होते. तर त्रेपन्न टक्के गुण मिळवून रघू बी.ए. होतो. वामनराव देवकाते आपल्या कन्येला बाबासाहेब नाईक शिक्षण महाविद्यालयात डी.एड. साठी प्रवेश मिळवून देतात. रघू मराठी विषयात एम.ए. करायचा निर्णय घेतो. सीतारामचे बारावी बरोबर टायपिंग, रघूचा एम.ए.चा अभ्यास सुरु होतो. मात्र त्याचे मन अधूनमधून गावाकडे धावत राहते. गावाकडे आईचे काय चालले असेल ? सुदामा, मंजा भाबी, ल्हानी माय, यसोंता त्याला आठवत राहतात. कौसा पद्मीचे कसे चालले असेल याची त्याला काळजी वाटत राहते.

दिवाळीची सुट्टी मिळाल्यानंतर गावी आलेला रघू आपल्या कुटुंबातील सर्वांबरोबर आनंदाने दिवाळी साजरी करतो. त्या कुटुंबाची आजवरल्या आयुष्यातील ती सुखाची दिवाळी ठरते. लक्ष्मीपूजनाच्या सुखद प्रसंगी वालंबीला आपल्या नवऱ्याची कळणूची आठवण होते. आणि ती अस्वस्थ होते, ''लेकराचा बाप पाह्यजे व्हा आता किती हाकिर झाला असता त्याह्यले !'' असा विचार तिच्या मनात येतो. हुंड्याच्या दोनशे रूपये राहिल्याने त्रास होणाऱ्या पद्मीला त्रास होऊ नये म्हणून दोनशे रुपये पाठविण्याचे हरणीला निश्चित करुन रघू परत पुसदला येतो.

नाग दिवाळी झाल्यानंतर तुळशीचे लग्न लागल्यावर रघू-नंदाच्या विवाहाची वालंबीला आठवण येते. लग्नासंबंधी चर्चा करण्यासाठी रघू वसारीला येतो. वामनराव देवकाते येतात व भटजीकडून लग्नाची निश्चिती केली जाते. मात्र आपल्या भावकीकडून वालंबीची अडवणूक केली जाते. तशा परिस्थितीतही पुसदला रधू-नंदाचे लग्न पार पडते. वामनरावाकडून रघूला अंगठी, घड्याळाबरोबर संसाराउपयोगी वस्तू दिल्या जातात. लग्नानंतर रघू नंदाचा पुसदला संसार उभा राहतो. मात्र वालंबी वसारी सोडत नाही. सितारामचे महाविद्यालयीन शिक्षण सुरु असतानाच, दहा हजार रुपये भरुन वसारीला शाळेत नोकरी लागते. नंदाचे डी.एड्. चे दुसरे वर्ष सुरु असते.

कादंबरीतील कथानक पुसद आणि वसारी या दोन्ही पातळीवर आकार घेत राहते. गावाकडे लिलाच्या बाहेरख्याली स्वभावामुळे सीतारामने आपल्यावर अतिप्रसंग केल्याचा आरोप करते लिलामुळे यसोंता व सितारामध्ये भांडण होते.

दरम्यान रघूचे एम.ए. व नंदाचे डी.एड. पूर्ण होते आणि लगेच तिला शाळेत नोकरी लागते. त्यानंतर तिला दिवस जातात वालंबीला ही गोड बातमी कळविली जाते याच दरम्यान मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरचा प्रश्न चिघळतो. प्रा.जोगेंद्र कवाडेंचा मराठवाडा नामांतरच्या प्रश्नाला पार्ठींबा देणे, शरद पवारांचे स्वपक्षाच्या आमदारांना फोडून वेगळे निघणे, ठाकरेंचा नामांतराला विरोध या घटना घडतात रघूला मुलगी होते आणि सीतारामचे लग्न मामाच्या मुलीबरोबर व्हावे असे वालंबीला वाटू लागते रघू बी.एड. साठी बिनपगारी रजा घेतो. यवतमाळला शासकीय अध्यापक महाविद्यालयात त्याचे बी.एड. सुरु होते. सीतारामचे लग्न उषा बरोबर होते. मात्र लग्नात यसोंता दारु पिऊन भांडण करतो.

वसारीला नोकरी लागल्यानंतर सीताराम गावकीकडे दुर्लक्ष करतो. मांगांच्या मिळकतीवरचा आपला वाटा स्वत:हून सोडतो. लग्नासाठी दोनशे रुपये मागायला आलेल्या सुदामाला नकार देऊन कॉलराच्या साथीत धोंड्याला वालंबी दोनशे रुपये देऊन वाचवते. पुसदला प्राचार्य उध्वरिषे विद्यापीठात गेल्याने त्यांच्या जागी धुमाळ येतात. तर ज्युनिअरचे प्रा राठोड सिनिअर जातात. व रघूला प्रमोशन मिळून तो ज्युनिअर विभागात मराठीचा प्राध्यापक होतो. त्याचबरोबर पुढाकर घेऊन 'अण्णा भाऊ साठे एकता परिषदेची' स्थापना करतो. उषा, नंदा आणि भागीला मुलगे होतात. फकिराच्या घरातील शिळ्या मटण भाताचे निमित्त होऊन हरणीचा मृत्यू होतो वालंबी तिच्या मयतीचा खर्च स्वत: करते. सारजा मावशीचा ही मृत्यू घडतो

त्यानंतर वालंबी वसारीला घराचे बांधकाम सुरु करते. रघू आणि सीताराम एकत्र येऊन घराचे बांधकाम पूर्ण करतात. घराची वास्तुशांती होते. आणि घर बांधायचे वालंबीचे स्वप्न पूर्ण होते.

दरम्यान काळात - दलित समाजात जागृतीचे वारे वाहू लागले मातंग समाजाची अस्मिता जागी होऊन गावकीची कामे मातंग लोक टाकून देतात. या घटनेमुळे गावकरी मांगांवर बहिष्कार टाकतात. मांग पुढारी गावोगावी खेड्यापाड्यात हिंडून मांगांना सुधारणेचे महत्व पटवून देतात. नवबौध्दांचा आदर्श

मात्र समाजापुढे ठेवतात. मात्र नवबौध्द व मांग यांच्यात धर्मांतराच्या प्रश्नाचे दुरावा निर्माण होतो. रघू डॉ.आंबेडकरांच्या जयंती दिवशी भाषण करुन आपली भूमिका मांडतो. गावातील सवर्णांनी मांगांवर टाकलेल्या बहिष्काराचा फायदा नवबौध्द घेतात व मांगांना मदत करण्याऐवजी कोंडीत पकडतात. तरही मांगलोक गावकीचे प्रतिक ठरलेले डफडे फोडून टाकतात. तर यसोंता जगदीशच्या भूलथापाला बळी पडून पुन्हा डफडे मढवतो.

शेवटी अल्सरचे निमित्त होऊन वालंबी आजारी पडते. रघू-नंदा आग्रह करुनही वसारी सोडून पुसदला जायला ती तयार होत नाही. आणि तशातच वालंबीचा मृत्यू होतो. यसोंत्याच्या वागण्याने मांग समाजात निर्माण झालेल्या संघर्षामुळे वालंबीच्या अंत्यविधीसाठी मांग पुढे येत नाहीत शेवटी वालंबीचे वागणे आणि पांडुरंग पाटलाच्या पुढाकाराने वालंबीच्या अंत्यविधीसाठी भावकी पुढे येते. त्यावेळी सूर्य मावळतीला जाऊन आकाशात सांजवेळ झालेली असते.

अशा प्रकारे 'सांजरंग' मधील हृदयस्पर्शी कथानकाचा शेवट होतो.

**कथानकाचा आशय :-**

वालंबी ही एक सर्वसामान्य मागासवर्गीय मातंग समाजात जन्मलेली माय माऊली. आपली दोन मुले व एक मुलगी यांना शिक्षण देऊन घडविण्यासाठी आयुष्यभर कष्ट करते व कुटुंब सावरते. स्वतःच्या वाट्याला आलेले दुर्दैव अनावश्यक शोक न करता स्वीकारते व दारिद्रयाला प्रचलित समाजस्थितीत तोंड देते, मानवी जीवनाला स्पर्श करुन जाणारे सांजरंगचे कथानक अधिक वास्तव असून अस्पृश्य समाजाच्या जीवनाशी भावनात्मक अनुबंधही साधते. साहित्य व समाजजीवन यांचा अन्योन्य संबंध कसा असतो. हेही या कादंबरीवरुन स्पष्ट होते. मानवी जीवनातील घटना, प्रसंग, आणि संघर्ष हे साहित्यात कसे प्रकट होतात याचा प्रत्यय 'सांजरंग' या कादंबरीच्या कथानकातून येतो.

कथा, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आदी वाङ्मय प्रकारापेक्षा 'कादंबरी' वाङ्मयप्रकार अधिक प्रभावी व रोचक व मनोरंजक आहे. मराठी कादंबरी वाङ्मयाला शंभर वर्षांची परंपरा आहे. उत्कटता हा ललित वाङ्मयाचा प्राण असतो. कथानक, व्यक्तिचित्रणे, प्रसंगाची योजकता, संवादकौशल्य, भाषाशैली,

गुंतागुंत, उकल व परिणामकारकता इ. घटकांतून जीवनाचा पट कादंबरीत रंगविलेला असतो. कादंबरीत वास्तवाच्या अंशावर कल्पकतेचा फुलोरा उभारलेला असतो. कादंबरीच्या कथानकात नायक, नायिका, खलनायक ही प्रमुख पात्रे येत असतात. कथानकाच्या पुर्ततेसाठी गौण पात्रेही कादंबरीत आवश्यक असतात. खलनायकाच्या पात्रामुळे कथानकाला गती येते. कधी कधी प्राप्त परिस्थिती, खलनायक ठरु शकते. कमीत कमी पात्रे व प्रसंगाच्या सहाय्याने, जास्तीत जास्त परिणामकारकपणे सांगितलेली एकच एक कथा हे लधुकथेचे वैशिष्ट्य असते. मात्र कादंबरीचा विस्तार अफाट असतो. अनेक पात्र प्रसंगांच्या सहाय्याने जीवनाचे अनेक पदर कादंबरीत उलगडत गेलेले असतात. अनेक स्तरातून कादंबरी परिणाम साधत असते. व वेधक होत जाते. नाटकासारख्या ललित वाङ्मयात पात्र व प्रसंगातून संवाद कौशल्याने कथानक गुंफलेले असते

वाङ्मयप्रकार कोणताही असो, व्यक्तिचित्रणामुळे त्या त्या वाङ्मयप्रकारात जिवंतपणा व प्रत्ययकारीता प्राप्त होत जाते. व्यक्तिचित्रणातून जिवंतपणा प्राप्त करुन उत्कंटा निर्माण होत असते. व उत्कंठेतून रंजकताही निर्माण होते. 'सांजरंग' कादंबरीमध्ये रघू हाच नायक आहे रघू इतकीच वालंबी ही व्यक्तिरेखा महत्वपूर्ण आहे. वालंबीने नवऱ्याला दिलेला शब्द पुरा केला व तिला जन्माचे सार्थक झाले असे वाटते. दोन मुले व एक मुलगी यांचे शिक्षण पूर्ण होऊन ती संसाराला लागतात. या समाधानात 'सांजरंग' च्या शेवटी वालंबीचा अंत होतो. या संदर्भात विनय हर्डीकर म्हणतात, ''तिच्या आयुष्याची सुरुवात मध्यरात्रीच्या अंधारात झाली होती. त्यामुळे शेवट संध्याकाळच्या उदास पण प्रसन्न रंगात व्हावा हे औचित्य श्री. कांबळे यांनी सांभाळले आहे.''[१]

**व्यक्तिचित्रणे :-**

**रघू :-**

वालंबी इतकीच या कादंबऱ्यांमधील दुसरी महत्वाची व्यक्तीरेखा म्हणजे रघूची आहे. 'सांजरंग' मधील कथानकाचा विचार करता स्वातंत्र्योत्तर काळातल्या दलित समाजातील नव्या सुशिक्षित विचार करु शकणाऱ्या युवकाचे प्रतिनिधित्व रधू करताना दिसतो. कारकून म्हणून नोकरी लागलेला रघू तेथेच न थांबता, पुढे एम.ए.बी.एड. करुन ज्युनिअर प्राध्यापक होतो व शैक्षणिक विकास करुन प्रगतीचा प्रवास करतो. वसारीहून शिक्षणासाठी पुसदला आल्यावर देवकाते कुटुंबाची रघूला वेळोवेळी मदत होते मात्र स्वाभिमानी मनाचा रघू

त्यामुळे अस्वस्थ होत असतो आणि व्यवहारासाठी स्वाभिमान सोडावा लागतो. हे त्याला मनोमन पटते.

रघू अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या जीवनाची वाटचाल करतो जीवनसंघर्षात त्याला एकट्यालाच आधार नसल्याने लढावे लागते. आर्थिक सबल झालेला रघू आपली आई, भाऊ, आपला मांग समाज यांना विसरत नाही. हा त्यांचा जीवनप्रवास नजरेत भरणारा आहे. सभोवतालची परिस्थिती समजून पुढे जाणारा तो यशस्वी दलित नायक ठरतो रघूचे जीवन हे दलित तरुणाचे जीवन आहे. त्याचा संघर्ष हा दलित तरुणाच्या वाट्याला येणारा संघर्ष आहे. जीवन संघर्षाला सामोरे जाताना सुख सहज मिळत नाही हाच अनुभव त्याला येत राहतो.

शिकून मिळवता झालेला रघू आपली आई वालंबी, भाऊ सीताराम, चुलता, चुलती पायरु हरणी आणि मांग समाज यांना विसरत नाही. पद्मीची सासूच्या छळातून मुक्तता करण्यासाठी, हरणीच्या आग्रहाखातर दोनशे रुपयाची मनिऑर्डर पाठवून रघू हरणीला मदत करतो.

रघूच्या जीवनाला सामाजिक जीवनाचे वास्तव आहे सामाजिक व्यवस्था दारिद्र्य व वर्णव्यवस्था या तिहेरी परिस्थितीचा रघू हा प्रतिनिधी आहे. आपल्या आईच्या जिद्दीला न्याय देणे आणि शिक्षण घेवून तिच्या इच्छा पूर्ण करणे हे कादंबरीमधले रघूचे दृश्यकार्य आहे. परंतु रघुचे कादंबरीतील स्थान दलित समाजातल्या स्वातंत्र्योत्तर काळातल्या नव्या सुशिक्षित पिढीच्या विचार करु शकणाऱ्या युवक प्रतिनिधीचे आहे हे विनय हर्डिकरांनी मांडलेले मत यथार्थ आहे. आपली आई व दलित समाज यांच्या संदर्भात रघुच्या जीवनात येणाऱ्या संघर्षाचे सर्व संदर्भ कादंबरीकाराने रघूभोवती मांडले आहेत. रघु व वालंबी यांचे मुळ, हे नाते उत्कट व अतूट असे दाखविले आहे. हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. शिकून सवरुन, एक कुटुंबप्रमुख व एक जबाबदार नागरिक या नात्याने त्याचा आपल्या आईशी वैचारिक संघर्ष होत नाही. वास्तविक दोघांच्यामध्ये वैचारिक अंतर बरेच असूनही कोठेच संघर्ष उद्‌भवत नाही. ऐन तारुण्यात आपल्या आईला जीवन संघर्षाला तोंड देताना भ्रष्ट होण्याची वेळ आली होती. परंतु ती भ्रष्ट झाली नाही. याची जाणीव रघूला अंतर्मुख करते. आपल्या मांग समाजाचे होणारे लैंगिक, आर्थिक, सामाजिक शोषण प्रत्यक्ष पाहताना, अनुभवतांना समाजाची रघूला चीड येत होती. परंतु स्वत:चा शैक्षणिक, आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी रघू शांत, मूक व संयमी राहतो. गावगाड्यातला मांगांचा होणारा अपमान, तिरस्कार

कधी कमी होणार याबादल रघूचे साशंक मन निराशेच्या गर्तेत सापडते. परंतु या संदर्भात रघू आक्रमक व अवास्तव भूमिका घेत नाही. परंतु त्याच्या अंतरंगात वैचारिक वादळ उठत राहते व तो अस्वस्थ होत राहतो. समाजातील सवर्ण समाजाकडून महार, मांग आदी मागासवर्गीय समाजाचे होणारे शोषण, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दलची मते त्याच्या वयाच्या मानाने खूपच परिपक्व वाटतात. वरकरणी समान भासणाऱ्या शोषित दलित समूहामध्ये अंतर्विरोध रघू जाणतो परंतु हा संघर्ष, समाजाचे होणारे शोषण थांबवणे आपल्या आवाक्याबाहेरचे आहे हे तो जाणतो. जेव्हा जेव्हा सामाजिक अथवा कौटुंबिक संघर्ष होतो तेव्हा रघू आपली भूमिका घेऊन झगडत बसल्यास आपला विकास होण्याऐवजी आपला अपकर्षच होईल हे मनोमन तो जाणतो. व जी नोकरी प्रतिष्ठा आपल्याला मिळालेली आहे ती स्थिर ठेवण्याची तो भूमिका घेतो. याचा अर्थ रघू दुबळा, भित्रा, स्वार्थी आहे असे नव्हे. प्रचलित समाजाशी मिळते जुळते घेऊन आणि प्राप्त परिस्थितीशी मिळते जुळते घेऊन जीवनाची वाटचाल करण्याची रघूची प्रवृत्ती आहे. महार दलितांना बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा फायदा झाला. मांग समाजाला अण्णा भाऊ साठे यांचे नेतृत्व प्राप्त झाले. प्रत्येक शोषित जातीला स्वत:चे वेगळे आदर्श पुरुष शोधून काढावे लागले. या वास्तवाचे भान रघूच्या अंर्तमनात अस्वस्थता निर्माण करतात. यामुळे दलित मुक्तीची चळवळ दुबळी झाली. अशा गोष्टीचा विचार रघूच्या माध्यमातून श्री कांबळे यांनी कादंबरीत स्पष्टपणे नोंदविल्या आहेत. अनेक वर्षे दलित समाजाने राखीव जागांचा फायदा एकाच कुटुंबातील व्यक्तींसाठी न घेता इतर कुटुंबांनाही त्याचा फायदा मिळावा. ही व्यापक भूमिका श्री. कांबळे यांनी रघूच्या माध्यमातून मांडली आहे

रघूचे वय लक्षात घेता रघूमध्ये जी स्वाभिमानाची आणि विद्रोहाची भावना वारंवार उसळून बाहेर पडते ती तितकीशी स्वाभाविक वाटत नाही. कृत्रितम वाटते. तरीही रघूची व्यक्तिरेखा साने गुरुजींच्या तत्वप्रणालीत बसणारी व्यक्तिरेखा आहे. त्यामुळे वाचकांच्या मनामध्ये रघूचे व्यक्तिचित्र अधिक प्रभावीपणे ठाण मांडून बसते वाचक रघूला विसरु शकत नाहीत. मूलं ही रघूसारखी संयमी, सोशिक असावीत असा अभिप्राय वाचकांचे अंर्तमन देत राहील.

**वालंबी :-**

वालंबीची व्यक्तिरेखा कांदबरीकाराने अधिक सशक्त उभी केली आहे. 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबरीत कादंबरीकाराने रघूच्या जीवनावर लक्ष केंद्रित केले असले तरी वालंबी डोळ्याआड होत नाही. आपल्या दोन्ही मुलांवर आणि कौसावर ती अखेरपर्यंत जीवापाडं प्रेम करीत राहते. त्यांची सतत काळजी करीत राहते. हळवी बनते. अस्पृश्याचं जीणं वाट्याला आलेली वालंबी स्वत· निरक्षर आणि हलाखीचं आयुष्य जगत असताना मुलांना घडविण्यासाठी धडपडत राहते.

विनय हर्डीकरांनी वालंबीच्या व्यक्तिमत्वाचे अंतरंग 'सांजरंग' या कादंबरीच्या प्रस्तावनेत अतिशय बारकाईने टिपले आहेत. 'रघू सिताराम यांनी नोकऱ्या करुन गावकीकडून चांगले म्हणून घ्यावे आणि झोपडीच्या जागी स्वत:चे घर असावे याच्या पलिकडचे दलित मुक्तीचे स्वप्न वालंबीच्या विचारातही नाही आणि हृदयातही नाही. या छोट्या स्वप्नामागे धावताना तिने गावगाड्याशी भांडण घेतले नाही तर पडते घेऊन आपली शुध्दता आणि उपयुक्तता गावकऱ्यांना पटवून आपला मुक्काम गाठला '

वालंबीची दोन्ही मुले शिकून नोकरीस लागली तर वालंबी आपल्या स्वभावात बदल घडवत नाही. गावगाड्याच्या आश्रयानेच आपल्याला जगावे लागते याचे भान ती ठेवते. गावातील कुणाबद्दलही ती तक्रार करीत नाही. कष्ट करुन आपले पोट भरणे हे तत्व तिने स्वीकारलेले असते. रघू आणि सीताराम शिक्षण घेतल्यामुळे फुले,आंबेडकर विचारांनी प्रेरित झाल्यामुळे गावगाड्यातील अन्याय शोषणाविरुध्द आवाज उठविण्याचा प्रयत्न करतात. मात्र वालंबी त्यांना गावगाड्याचे व मांग भावकीशी नाते तोडू देत नाही. आणि स्वत:ही तोडत नाही. रघू आपल्या नोकरीच्या ठिकाणी पुसदला घेऊन जाण्याचे वालंबीला ठरवतो तेव्हा ती वसारी सोडत नाही. मुलाच्या पैशांवर जगणं तिला नकोसे वाटते. मुलगी कौसासाठी तिचा जीव तुटत राहतो. 'पण वतनाचं गाव, हाक्काचं घर सुटत नाही. मी ऱ्हाते इथीच.'' ही तिची मनोभूमिका असते.

वालंबी शिकलेली नसल्याने अशिक्षित ठरत असली तरी व्यवहार ज्ञान व अनुभवामुळे तिला चांगले वाईट समजते. वसारीत येऊन बुवाबाजी करीत असलेला महाराज हरणीच्या घरात मुक्काम करतो तेव्हा वालंबी हरणीची चांगलीच कानउघडणी करते. आपल्या घरात तरुण मुलगी असताना अनोळखी पुरुषाला घरात ठेवून घेणे वालंबीला रुचत नाही. यातून वालंबीची दूरदृष्टी दिसून येते. नैतिकता स्पष्ट होते.

'देहाची भूक लई वक्री' हे जाणून तरुण वयातच विधवाव झालेली वालंबी अतिशय निग्रहाने, संयमाने आपल्या जीवनाचा प्रवास करत राहते. हे वालंबी या व्यक्तीरेखेचे वेगळेपण आहे.

**इतर व्यक्तिचित्रणे :–**

**सीताराम :–**

वालंबीचा दुसरा मुलगा सीताराम हा ही रघूप्रमाणेच आईच्या आज्ञेत वागणारा दिसून येतो. तो आपला भाऊ रघूच्याच मार्गाचे अनुसरण करतो. रघूला नोकरी लागल्यावर सीतारामला मिळणाऱ्या सवलती त्याने नाकाराव्या, असे रघूला वाटते. परंतु सीताराम त्याच्या विचाराशी सहमत नसतो. आपण अजून आर्थिक सबल झाले नाही. सवलती नाकारल्याने अनेक अडचणी उभ्या राहतील असा पोक्त विचार सीताराम रघूला देतो. यावरुन सीतारामचे विचारी व्यक्तिमत्व दिसून येते. सीताराम आपली कौटुंबिक परिस्थिती लक्षात घेऊन रघूबरोबर पुसदला राहून आपले शिक्षण पूर्ण करतो. टायपिंगची परीक्षा पास होतो. मात्र पुढील शिक्षण घेऊन आर्थिक अडचण करुन घेण्यापेक्षा नोकरीचे विचार सीतारामच्या डोक्यात येतात त्यामुळे सीतारामला परिस्थितीची जाण आहे असे दिसून येते.

यसोत्याच्या पत्नीला लीलाला आणण्यासाठी हरणीच्या सांगण्यावरुन सीताराम रिठदला जातो. येताना वाटेत लीला आपले देह प्रदर्शन करुन सीतारामचे मन विचलित करण्याचा प्रयत्न करते. मात्र संयमी, सुशील सीताराम तिच्या वासनेला बळी पडत नाही. त्याच्या मनात विचार येतात, ''कशी असेल लिला भाबी तरी ? काय असेल तिच्या मनात ? शरीर संबंधाची ओढ ? असेल . त्याशिवायच का तिने आपल्याला हाक मारली ? नको तितकी उघडी झाली. कशाचा काटा रुतला तरी ? चेहऱ्यावर वर वेदना नव्हती तिच्या. दुसरेच भाव दिसत होते त्यावर. काय वाटले असेल तिला आपल्या विषयी ? आपण तिला फशी पडू असे ? छे ! कसे पटावे आपल्याला ? स्त्री फक्त स्त्रीच असते ? पुरुष फक्त पुरुषच असतो ? छे ! छे ! त्यांच्यात काही एक नाते असते. आणि तेच श्रेष्ठही असते शरीरापेक्षा !''

या बिकट प्रसंगी सीताराम लिला भाबीपासून पुरुषी भावनेवर विचाराने विजय मिळतो आणि आपले चारित्र्य शुध्द ठेवतो. बारावी पास झालेल्या सीतारामला रघूच्या प्रयत्नाने वसारीला गावच्या शाळेत कारकूनाची नोकरी मिळाल्यावर तो आई वालंबीची काळजी घेत नोकरी करत राहतो मात्र गावी राहूनही तो

भावकी व गावगाड्यापासून दूर राहतो. पोळ्याच्या सणाला मांग लोक गावात मोळ टाकायला जातात. पोळा सण मागायला जातात. मात्र सीताराम गावच्या गावकीत अडकत नाही. मात्र मांग समाजाने गावकी सोडून देताच, गावाकडून बहिष्कार टाल्यावर झालेल्या संघर्षात सीताराम रजेचा अर्ज देऊन मांग समाजातील नेत्याबरोबर तालुक्याच्या ठिकाणी जातो आणि मांग समाजाच्या सुधारणेसाठी प्रयत्न करीत राहतो. यसोंता भाऊ आपल्याबरोबर फटकून वागला तरी मोठ्या मनाने सीताराम त्याला मदत करीत राहतो.

सीताराम ही व्यक्तीरेखा महत्वपूर्ण ठरली आहे. आपली आई वालंबी व भाऊ राघू यांच्या आज्ञेत राहून आपल्या जीवनाची वाटचाल करणारा सीताराम कादंबरीकाराने चित्रित केला आहे.

**यसोता :-**

मांग समाजातील अशिक्षित, व्यसनी, तरुणाचे चित्र यसोत्याच्या व्यक्तिचित्रणात दिसून येते. शिक्षण न घेतलेला यसोंता गावातील लोकांचे घरी सालगडी म्हणून राबत असतो. आपल्या घरच्या परिस्थितीचा विचार न करता दारुचे व्यसन करीत राहतो. दारुच्या पैशासाठी रानात राबताना लोकांच्या शेतातील कापूस, हरबरा, गहू चोरुन वाण्याच्या दुकानात विकून दारु पित राहतो. शंभय रुपये उधारी झाल्यावर घरावरील टीन काढून द्यायचे कबूल करतो. मात्र सीतारामने पैसे देण्याचे कबूल करताच बाणाजी हरणीच्या घरावरील टीन काढून घेण्याचे थांबतो असा हा यसोंता पायरु व हरणीचा एकुलता एक मुलगा दारुच्या व्यसनात घरावरील पत्रा विकायला काढतो.

बायकोचे ऐकून सीतारामवर संशय घेऊन सीतारामला मारायला धावतो. मांग समाजातील लोकांची अस्मिता जागृत होऊन ते गावकीची कामे टाकून देतात. 'वसारी' गावातही सुधारणेचे वारे वाहून लागते. मांग गावकीचे प्रतिक असलेले डफडे फोडतात. या घटनेमुळे गावकरीही मांगांच्यावर बहिष्कार टाकतात. अशावेळी यसोंता गावातील जगदीशच्या प्रलोभनाला बळी पडून त्याने दिलेले तीस रुपये व पायलीभर ज्वारी घेऊन येतो बदल्यात डफडे मढवण्याचा शब्द देतो.

गावाने बहिष्कार मागे घेतल्यावर मात्र मांग भावकी यसोंत्याला भावकीपासून फुटला म्हणून परतीबंद करण्याचे ठरवित शिक्षणापासून दूर राहिलेल्या यसोंत्याला अज्ञान, दारिद्रय सहन करावे लागते.

शिकलेल्या रघू, सीताराम बद्दल तो मनात असूया ठेवून राहतो. मात्र अखेर रघू, सीताराम या भावांचीच त्याला मदत होते.

**लीला :-**

'सांजरंग' या कादंबरीत लिला ही एक स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती यसोत्याची पत्नी आणि हरणीची सून आहे. मात्र ही स्त्री व्यक्तीरेखा शिलभ्रष्ट असल्याचे स्पष्ट होते माहेराहून सासरी येताना वाटेत तहान लागल्याचे सांगून सीतारामला विहीरीतून पाणी काढायला सांगते, आणि नंतर ओढ्याच्या घळीत जाऊन काटा लागल्याचा बहाणा करुन आपल्या स्त्री शरीराचे दर्शन सीतारामला घडविण्याचा प्रयत्न करते. सीताराम मात्र तिच्या वासनेला बळी पडत नाही.

सीतारामने आपल्याला सोबत केली नाही म्हणून हीच लीला भावी घरात साप निघाला आहे असे सांगून सीतारामला आपल्या घरी बोलावते आणि त्याच्याकडून शरीरसुखाची अपेक्षा करते. मात्र सीतारामने नकार देताच सीताराम आपल्या अंथरुणात आला म्हणून यसोंत्याला सांगते. आणि वालंबी व हरणीच्या कुटुंबात भांडण उभे करते. लिलाच्या उथळ वागण्याचे कादंबरीकाराने संयमी वर्णन केले आहे. अशी ही लीला एक दिवस माहेरच्या बौध्द समाजातील मूलाबरोबर पळून जाते.

**पद्मी :-**

पद्मी ही पायरु हरणीची मुलगी असते. पायरुच्या मृत्यूनंतर हरणी गडबडीत पद्मीचे लग्न ठरवते. लवकर लग्न उरकले नाहीतर रुढीप्रमाणे तीन वर्ष थांबवावे लागणार होते. म्हणूनच कळम कव्हाणच्या भगाजीच्या निंबाबरोबर पद्मीचे पाचशे रुपये हुंडा देऊन लग्न ठरविले जाते.

लग्नानंतर हुंड्याच्या दोनशे रुपायासाठी पद्मीला सासूचा सासूरवास सहन करावा लागतो. रात्रभर तिला पडत्या पावसात ओसरीत झोपावे लागते. तिच्या नवऱ्याला लिंबाला तिच्या सासूने मुकिंदाबरोबर सुरतला कामासाठी पाठवलेले असते. अशा अवस्थेत पद्मीला सासरी त्रास सोसावा लागतो. निरोप देऊनही हुंड्याचे पैसे दिले जात नाही म्हणून पद्मीला तिची सासू दोन वेळचे जेवण बंद करुन एकाच वेळेला जेवण देते. तिला सासूकडून होणारा त्रास सहन करावा लागतो.

सासूरवास सहन करणाऱ्या स्त्रीचे व्यक्तिचित्र पद्मीच्या रुपात कादंबरीकार कांबळे यांनी रंगविले आहे.

**मांग वेटाळाशी आणि बौध्द वेटाळाशी संबंधित व्यक्तिरेखा :-**

नामदेव चं. कांबळे यांच्या 'ऊनसावली' व 'सांजरंग' या दोन कादंबरीत वालंबी. रघू, सिताराम, पायरु, हरणी, यसोंता, प्राचार्य, श्री.देवकाते, नंदा या प्रमुख व्यक्तिरेखांबरोबर मांग समाज आणि बौध्द समाजातील अनेक व्यक्तिरेखा येतात. त्यांचा विचार करता मांग समाजातील कौसा, गजरी, सुभाना, यादव दिलीप, गुंफा, सारजा मावशी, कमलाबाई, माधव, सुदामा, बुग्या, पुंड्या, शिक्र्या कचऱ्या, तर बौध्द समाजातील राजराम कांबळे ही व्यक्तीचिते साचेबंद झाल्याचे जाणवते.

**वसारी गावासंबंधी व्यक्तिरेखा :-**

'ऊनसावली' व 'सांजरंग' या दोन्ही कादंबरीतील कथानक 'वसारी' या गावात घडत राहते. त्या दृष्टीने या कथानकात वसारी गावातील अनेक व्यक्तीरेखांचा संबंध येत राहतो त्याचा विचार करता, गोपाळराव देशमुख, वामन भोजाजी, पांडुरंग पाटील, काशिबा लादे, जगदीश सरपंच. कथानकात येणाऱ्या या सर्व व्यक्तीरेखा वालंबी, रघूच्या भोवतीची माणसे वालंबी, रघूचेच व्यक्तिमत्व अधिक गडद करताना दिसतात.

**प्रसंग :-**

'उनसावली' या कादंबरीप्रमाणेच 'सांजरंग' या कादंबरीतही येणारे अनेक प्रसंगवर्णने कधी लोभस तर कधी भेदक झाली आहेत. कादंबरीतील प्रसंगावरुन मांग समाजातील दैन्यावस्था, दु:ख, दारिद्रय, अन्याय, रुढीपरंपरा इत्यादी दर्शन आपणास होते.

कादंबरीकार श्री.कांबळे यांनी स्त्री दु:खाचे चित्र स्पष्ट करताना पद्मीच्या सासूरवासाचा प्रसंग कारुण्यपूर्ण रंगविला आहे नवरा मेल्यावर हरणी आपल्या मुलीचे पद्मीचे गडबडीने लग्न उरकून घेते. अडाणी नवरा मुलगा असतानाही पाचशे रुपये हुंड्रा ठरविला जातो. मात्र लग्न झाल्यावर हुंड्याच्या राहिलेल्या दोनशे रुपयांसाठी पद्मीची सासू सासूरवास करीत राहते. अंधाऱ्या रात्री तिला घरात न घेता ओसरीत झोपायला सांगते.

'येव द्या न व ऽऽ आत्या घरात मले भ्या वाटते ' पद्मी सासूला म्हणाली. 'कोण नाही खात तुले ? झोप मुकाट्यानं '

'शालू बाईले तरी झोपू द्या न माह्याजोळ.'

'नाही म्हंतो न '

सखू तिच्यावर खेकासली तिने दाराला आतून कडी टाकली. पद्मी बाहेर ओसरीवर एकटी पडली तेवढ्यात आभाळ गरजले आणि पाऊसाचे थेंब पडू लागले. गवताने शाकारलेली ओसरी या वर्षी शाकारली नसल्याने पद्मी चिंतागती झाली. हुंड्याचे दोनशे रुपये राहिले म्हणून पद्मीला पडणाऱ्या पावसात ओसरीवर रात्र काढावी लागते. या प्रसंगातून स्त्रीच्या दु:खाचे चित्र भेदकपणे रंगविले आहे. तिला होणारा जाच ही एक दु:खद गोष्ट असते. याचा प्रत्यय या प्रसंगातून येतो.

महाराष्ट्र मराठवाडा नामांतर आंदोलन सातत्याने सुरु होते मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी दलित जनतेकडून पुढे आली होती. ही मागणी पुढे रेटण्यामध्ये औरंगाबादमधील दलित पॅंथर्सचा सहभाग मोठा होता. दिवसेंदिवस नामांतराची चळवळ व्यापक होत होती. नामांतराच्या लढ्यात दलितेवर समतावाद्यांचा सहभाग असला तरी विरोधकांनी नामांतराला विरोध दर्शविला होता. अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ.बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यपीठ' असा नामविस्तार केला. नामदेव कांबळे यांनी नामांतर प्रसंगी झालेल्या लाँग मार्चचे चित्रण दलितांच्या अस्मितेचे चित्रण करणारे ठरले आहे ''लाँग मार्च नागपूरहून निघाला. मुक्कामाचे नियोजित ठिकाणी थांबू लागला. कार्यकर्त्यांसाठी जमिवलेल्या डाळ धान्यातून त्यांचे जेवणखाण होवू लागले. जमलेल्या पैशातून चहापान होवू लागले. बौध्द जनता त्यासाठी खपू लागली. रात्रीच्या सभांना गर्दी जमू लागली दुसऱ्या दिवशी मुक्काम हलला की गावातील पाच, दहा, वीस, तरुण त्यात सामील होऊ लागले. त्यात एखादा दुसरा मांग वेटाळातील असायचा. बाबसाहेबांचे नाव मागायला तोही घराबाहेर पडायचा.''

नामांतर घटनेच्या प्रसंगी अनेक दलितांवर अन्याय अत्याचार झाले याचे चित्रणही कादंबरीकाराने 'सांजरंग' कादंबरीत घडविले आहे.

कादंबरीकाराने मातंग समाजाची विद्रोही जाणीव व्यक्त करणारा प्रसंग अतिशय तपशीलाने मांडलेला आहे. गावात सुधारणेचे वारे वाहू लागलेले असते. गावात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी होते. नवबौध्द समाजाप्रमाणे मांग लोकही गावकी सोडण्याचा निर्धार करतात. गावकीचे प्रतिक असलेले डफडे फोडण्याचा निश्चय करतात. मिरवणूक निघते. चावडीवर जाऊन डफडे फोडले जाते.

''पाहता पाहता ती वार्ता गावभर झाली. गावातील लोकांनी चावडीवर गर्दी केली. मांगांनी डफडी फोडली. पहिला दगड पाहुण्याने टाकला. मग प्रत्येकाने आपापल्या डफड्यावर दगड घातले. गावकरी पहातच राहिले. बौध्दांना ही बातमी कळाली. ते ही आनंदले. त्यांनी मांगांचे एकमुखी कौतुक केले.'' अशा शब्दात कादंबरीकाराने हा प्रसंग चित्रित केला आहे. डफडे फोडण्याला सामाजिक गुलामीचा संदर्भ असतो. परंपरेने चालत आलेल्या समाजव्यवस्थेला मांगांनी नकार दिलेला असतो. त्यामुळे त्यांना गावकऱ्यांच्या बहिष्काराला सामोरे जावे लागते.

या प्रसंगाचे अचूक चित्रण कादंबरीकाराने केले आहे. मांगांना चक्की, दुकान बंद केले जाते. नामदेव कांबळे यांनी अशा प्रकारच्या प्रसंगातून गावपातळीवर मांग समाजावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण घडविले आहे. एक एक प्रसंग वाचकांच्या डोळ्यापुढे जिवंत स्वरुपात उभा राहतो.

'सांजरंग' या कादंबरीत वालंबीच्या मृत्यूचा अखेरचा प्रसंग वालंबीचे व्यक्तिमत्व उजळून काढणारा व मांग समाजातील भावकीच्या वागण्याने मन सुन्न करुन टाकणारा आहे.

वालंबीचे दुखणे वाढत गेल्यावर रघू तिला आपल्या बरोबर नोकरीच्या ठिकाणी चलण्याचा आग्रह करतो. मात्र तिला गावची माती सोडवत नाही. त्यातच वालंबीचा मृत्यू होतो. आयुष्यभर भावकी आणि गावकी दोन्ही संभाळलेल्या वालंबीला मात्र तिच्या पुतण्याने यशवंताने मांगांनी घेतलेली डफडे वाजविण्याची प्रतिज्ञा मोडली म्हणून भावकी दूर लोटते. तिच्या अंतक्रियेच्या वेळी तिच्या प्रेताला हात लावण्यास नकार देते.

''साडेचारनंतर मांग वेटाळातील एकेक माणूस येऊ लागले. चौकसपणे वालंबीच्या घराकडे पाहून स्वत:च्या घराकडे वळू लागले. पाच वाजत आले. तिरडीच्या साहित्याची जुळवाजुळव केव्हाचीच झाली. पण वेटाळातील कोणीच आपणहून पुढे होईना. मांग एकटे दुकटे विजेच्या खांबाजवळ, गावात जाणाऱ्या रस्त्यावर, हरणीच्या अंगणाच्या कडेला, रघूच्या घरापासून अंतर राखून असे बसले. परंतु कोणीच जागचे उठेना. तिरडी बांधताना नेहमी पुढाकार घेणारा बुग्याच स्वस्थ बसल्यावर इतर जागचे हलतातच कशाला.''

अशा प्रकारे कादंबरीकाराने वालंबीच्या मृत्यू प्रसंगी मांग जातीने निर्माण केलेल्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. रघू या प्रसंगी बुग्या, शिवऱ्याची विनवणी करतो मात्र भावकीला दया येत नाही. अखेर गावच्या पाटलांच्या पुढाकाराने वालंबीची अंत्ययात्रा निघते.

''बायका उठल्या. वालंबीची आंघोळ झाली. तिरडी बांधून झाली. सूर्य मावळतीला गेला होता. परंतु आकाशात सांज फुलली होती. मांग वेटाळावर अन् गावावरही आपली सुवर्णमयी माया उधळत होती.''

अशा स्वरुपाचा 'सांजरंग' कादंबरीचा अखेरचा प्रसंग वाचताना आपल्याला देखील वाईट वाटते. आपले मन खिन्न होते. जातीच्या व्यवहाराचे मन सुन्न करणारे चित्र या प्रसंगातून चित्रित झाले आहे.

'सांजरंग' मधील अशा अनेक प्रसंगातून नामदेव चं. कांबळे यांनी समाजजीवन दर्शन घडविले आहे काही प्रसंग मानवी मनाला चटका लावणारे आहेत. अनेक प्रसंग व घटना कादंबरीकाराने आपल्या लेखनशैलीने जीवंत केल्या आहेत. काही प्रसंगातून कांबळे यांनी सामाजिक प्रश्नांना शब्दरुप दिले आहे.

**मनोविश्लेषण : –**

'सांजरंग' या कादंबरीतील व्यक्तिरेखा चित्रित करताना त्या अधिक जिवंत वाटाव्यात प्रत्ययकारक ठराव्यात म्हणून कादंबरीकाराने उत्तम स्वभाव लेखनासाठी मनोविश्लेषणाचा उपयोग केला आहे.

''काय करावे यर्सोताले ? काहून आसा करत आसन ह्ये ? आपण एका पखानं उणं ह्ये चांगला व्हावं. आसं वाटत नसनं शाळा शिकायची तव्हा नाही शिकला. आता दुखान धावायचं सुखानं खायाचं. तर ते व्होना त्याले. आठा पंधरा दिसा पिऊन येतो. कव्हा काय तर बुवाच्या घरी आमका सायेब येणार ह्ये

म्हून पाडली घरी. पेली त्यातली, करावत्त काय ? कायमच कराव तरी ?

हरणीच्या या मनोविश्लेषणातून मुलगा यसोंता संबंधीची खंत व्यक्त झाली आहे. आपला मुलगा दारुच्या व्यसनात अडकतो आहे याचे तिचा वाईट वाटत राहते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मराठवाडा विद्यापीठाला नाव देण्याच्या प्रसंगी रघूचे विचार त्याच्या मनाचे दर्शन घडवितात.

''बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यायला हवे. सरकारने आपल्या भूमिकेवर ठाम असायला हवे. मराठवाड्यातील सवर्णांनीही नामांतराला विरोध करायला नको. कारण बाबासाहेबांचा जन्म दलित समाजात झाला हा एक अपघात होता. अपघात नाही तर काय ? जन्म मरण कोणाच्या हाती असते? कोणा घरी जन्म घ्यावा हे जसे माणसाच्या हातात नसते. तसा आपला मृत्यू कुठे, कसा होईल हेही त्याला ठाऊक नसते. प्रत्येकाचा जन्म म्हणजे एक अपघात असतो. आणि मृत्यूही अपघात असतो. बाबासाहेबांचा जन्म दलित समाजात झाला असला तरी ते विचार व कृतीने दलित कधीच नव्हते. भारतीय होते ते. भारतीयांचा मानबिंदू होते. त्यांच्या नावाला विरोध करणे म्हणूनच इष्ट ठरत नाही.''

रघूच्या या मनोविश्लेषणातून कादंबरीकाराने रघूचा डॉ. आंबेडकरांच्या बद्दलचा स्वाभिमान स्पष्ट केला आहे. कादंबरीकार नामदेव कांबळे यांची भाषाशैली मनोविश्लेषण करण्यास समर्थ आहे असे वरील मनोविश्लेषण वर्णनावरुन स्पष्ट होते.